# *3.2.1 Institution has created an ecosystem for innovations and has initiatives for creation and transfer of knowledge*

## *1. Initiative taken by Deptt. Of Marathi for Innovationas*

### अहवाल

**(INNOVATIVE PROGRAMME FOR P.G.STUDENTS IN MARATHI)**

**पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासपूरक उपक्रम सत्र २०१७ ते २०२१**

**पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांना नियोजित अभ्यासक्रत शिकविला जातो परंतु त्यांच्या ज्ञानात भर पडावी व व्यक्तीमत्व विकास व्हावे या दृष्टीकोनातून पदव्युत्तर मराठी विभागातर्फे विविध अभ्यासपूरक उपक्रम सत्र २०१७ ते २०२१या कालावधीत राबविले गेले त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे:—**

**'जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र**

बहुजन हिताय जगत शिक्षण संस्थाव्दारा संचालित जगत कला, वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे दि.३० मार्च २०१७ ला विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत मराठी विभागांतर्गत 'जागतिकीकरण आणि मराठी लोकनाटय'या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन संस्थाध्यक्ष मा.जगतरामजी रहांगडाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.



चर्चासत्राचे उद्घाटन शारदामाता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करुन दीपप्रज्वलनाने करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बहुजन हिताय जगत शिक्षण संस्थेचे सचिव मा. नारायणजी येळे होते तर रा.तु.म.नागपूर विद्यापीठाचे पदव्युत्तर मराठी विभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ.शैलेंद्र लेंडे यांच्या शुभहस्ते चर्चासत्राचे उद्घाटन करण्यात आले.बिजभाषक म्हणून सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.हरिश्चंद्र बोरकर तर प्रमुख अतिथी म्हणून समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.संजय पोहरकर तर प्रमुख उपस्थितीत प्राचार्य डॉ. नीलकंठ लंजे, उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले विचारमंचावर उपस्थित होते.

अतिथीचे स्वागत स्वागतगिताने करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले तर स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ.नीलकंठ लंजे यांनी केले. सुप्रसिध्द साहित्यिक डॉ.हरिश्चंद्र बोरकर यांनी बिजभाषण केले.

उद्घाटक प्रा.डॉ.शैलेंद्र लेंडे यांनी उद्घाटकीय भाषणातून "जागतिकीकरणात मानवी जीवनाच्या उत्थांनाचे केंद्रबिंदू मराठी लोकनाट्यात सामावले आहे,त्याकरीता जागतिकीकरणात मराठी लोकनाटयाचा वारसा टिकवून ठेवणे प्रत्येकाचे मूलभूत कर्तव्य आहे."अशाप्रकारे मौलिक विचार व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणातून मा.नारायणजी येळे यांनी "जगाचे अस्तित्व कलेवर अवलंबून आहे त्याकरीता कलेला जीवंत ठेवण्याकरीता अशा चर्चासत्राची नितांत गरज आहे. "अशाप्रकारे मौलिक विचार व्यक्त केले. या चर्चासत्राच्या उद्घाटन सोहळयाचे संचालन प्रा.आर.एम.गहाणे व प्रा.लोकेश कटरे तर आभार डॉ.सी.एस.राणे यांनी मानले.

'जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्य'या विषयावरील चर्चासत्राचे प्रथम सत्रात प्रमुख वक्ते म्हणून विद्याभारती महाविद्यालयाचे मराठी विभागप्रमुख,डॉ.नरेंद्र आरेकर व एस.एस.जे.महाविद्यालयाचे प्रा.डॉ.शरद मेश्राम यांनी वरील विषयावर विचार व्यक्त केले तर'मराठीतील लोककलाप्रकार 'या विषयावरील चर्चासत्राचे प्रमुख वक्ते म्हणून कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,कोराडीचे प्रा.डॉ.राजेंद्र वाटाणे व संताजी महाविद्यालय,पालांदूरचे प्रा.संजय निबेंकर यांनी वरील विषयावर विचार व्यक्त केले.या दोन्ही सत्राचे अध्यक्षस्थान.एम.बी.पटेल महाविद्यालयाचे प्रा.डॉ.अनिल नितनवरे यांनी भूषविले.

चर्चासत्राच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सुप्रसिध्द साहित्यिक हिरामण लांजे यांनी भूषविले तर प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिध्द साहित्यिक ओमप्रकाश शिव, प्राचार्य डॉ.नीलकंठ लंजे, उपप्राचार्य डॉ.एस.एच. भैरम,मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले विचारमंचावर उपस्थित होते.

श्री.हिरामण लांजे यांनी मार्गदर्शन करताना "प्राचीन काळापासून तर आजतागायत खरी लोकशिक्षणाची भूमिका लोकनाटयांनी पार पाडली आहे.समाजप्रबोधनाचे खरे माध्यम म्हणून लोकनाटयाचे महत्व अनन्यसाधारण आहे."अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले. या कार्यक्रमाचे संचालन डॉ.सी.एस.राणे व डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे तर आभार डॉ.सी.टी.राहुले यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.नीलकंठ लंजे, उपप्राचार्य डॅा.एस.एच.भैरम मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले, डॉ.सी.एस.राणे, प्रा.लोकेश कटरे,डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परीश्रम घेतले

**<u>'बळीराजाच्या मुला'प्रबोधनपर कार्यक्रम:–</u>**

जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे 'बळीराजाच्या मुला'प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या सुरुवातीला शारदा माता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.निलकंठ लंजे तर प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्राचे सुप्रसिध्द कवी व वक्ता प्रा.ज्ञानेश वाकुडकर,प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम,युथ फॉर स्वराज्य संघटनेचे अध्यक्ष मनिष कुमार, ,युथ फॉर स्वराज्य संघटनेचे महाराष्ट्र प्रमुख महादेव मिरगे,शकिल भाई,मराठी विभागपगमुख डॉ.चंद्रकुमार राहुले,डॉ. चैनलाल राणे व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख वक्ते प्रा.ज्ञानेश वाकुडकर यांनी मार्गदर्शन करतांना "शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी शेतकऱ्यांच्या मुलांनी जागृत राहून शासनाच्या ध्येयधोरणाकडे डोळस दृष्टिकोनातून लक्ष ठेवले पाहिजे. अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॅा.निलकंठ लंजे यांनी "शेतीशिवाय आपण आपल्या राष्ट्राचा सर्वांगीण विकास साधू शकत नाही."अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांनी मानले.या कार्यक्रमात डॉ.छाया पटले,प्रा.जे.बी.बघेले,प्रा.आर.एम.गहाणे,डॉ.कु.एम.के.देशपांडे, प्रा.कु.एल.वाय.ढवळे,डॉ.आर.बी.भैरम,डॉ. आर.एन.साखरे,डॉ.वसुधा मेश्राम,प्रा.इ.व्ही.चंदनखेडे, डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे,प्रा.प्रकाश मेहर प्रामुख्याने उपस्थित होते.

## ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सव कार्यक्रम:—



जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्याचा विद्यार्थ्यांना परीचय व्हावा तसेच वाङ्मयीन अभिरुची निर्माण व्हावी म्हणून गदिमायन व पुलोत्सवअतंर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. एन.वाय.लंजे व उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांच्या मार्गदर्शनाखाली मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले,डॉ.सी.एस.राणे, प्रा.लोकेश कटरे,डॉ.रविप्रकाश चंद्रिकापुरे यांच्या नेतृत्वात महाविद्यालयात करण्यात आले. .

**व्याख्यान:—**

जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सव व गदिमायन कार्यक्रम थाटात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून गोंविदराव मुनघाटे महाविद्यालय,कुरखेडाचे मराठी विभागप्रमुख डॉ.नरेंद्र आरेकर,मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले,डॅा.सी.एस.राणे, प्रा.लोकेश कटरे,डॉ. रविप्रकाश चंद्रिकापुरे इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रमुख वक्ता डॉ.नरेंद्र आरेकर यांनी ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यावर प्रकाश घातला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार डॉ.सी. एस.राणे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.



**.निबंधस्पर्धा:—** 'ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यातील जीवनदर्शन' या विषयावर निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**वक्तृत्वस्पर्धा :—** 'पु.ल.व ग.दि.माडगूळकर व्यक्ती व वाङ्मय' या विषयावर महाविद्यालयात वक्तृत्वस्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेत ग.दि.यांची भावकविता,ग.दि.यांचे वाङ्मय,पु.ल.यांचे विनोदी लेखन,पु.ल. यांचे प्रवासवर्णन,पु.ल.यांचे साहित्य अशा विविध विषयावर वक्तृत्वस्पर्धा घेण्यात आली.अशाप्रकारे विविध कार्यक्रम घेण्यात आले करिता माहितीस्तव सादर.

**गीतगायन स्पर्धा:—**'ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या साहित्यावर आधारीत गीतगायन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती या स्पर्धेत बहुसंख्य विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

**मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा:—**



जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे मराठी भाषा संवर्धन पंधरवाडानिमित्त व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे होते तर प्रमुख अतिथी म्हणून उपप्राचार्य डॉ. एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून श.जा.ति.कनिष्ठ महाविद्याालयाचे मराठी विभागप्रमुख प्रा.मोरेश्वर पटले,मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले,डॉ.सी.एस.राणे,प्रा. एकनाथ चंदनखेडे प्रा.लोकेश कटरे,. इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शारदा माता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून प्रमुख वक्ता प्रा.मोरेश्वर पटले यांनी मराठी भाषेचे संवर्धन करणे काळाची गरज आहे हे पटवून दिले.तसेच प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.सी.टी.राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार प्रा.एकनाथ चंदनखेडे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**रसयात्रा एक रसास्वाद व्याख्यान:—**

कुसुमाग्रजांच्या कवितेतून पारतंत्र्यांच्या काळातसुध्दा सामाजिक जाणिवा व क्रांतीकारक वृत्तीचा प्रसार प्रचार झाला हे स्वातंत्र्यलढयाला एक प्रकारची संजीवनीच ठरली'' अशाप्रकारचे मौलिक विचार जगत कला,वाणिज्य व इंदिराबेन हरिहरभाई पटेल विज्ञान महाविद्यालय गोरेगाव येथे मराठी वाङ्मय मंडळातर्फे आयोजित 'रसयात्रा:एक रसास्वाद' या व्याख्यानातून प्रमुख वक्ता म्हणून मार्गदर्शन करतांना मनोहरभाई पटेल महाविद्यालयाच्या प्रा.कु.इंद्रकला बोपचे यांनी व्यक्त केले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम होते तर प्रमुख अतिथी म्हणून मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकुमार राहुले,डॉ.सी.एस. राणे,प्रा.इ.व्ही.चंदनखेडे,प्रा.लोकेश कटरे,इ.मान्यवर विचारमंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सुरुवात शारदा माता व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आली. पुढे बोलतांना त्या म्हणाल्या की, कवी कुसुमाग्रज हे मराठी साहित्यातील महत्वाचे कवी असून आधुनिक काव्य व नवकाव्य यांना जोडणारे ते दुवा असून मानवतावाद त्यांचा कवितेचा स्थायीभव आहे. .

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम यांनी "कवी कुसुमाग्रज हे मराठीतील उत्तुंग आशावादी,समाजनिष्ठ व भावनिष्ठ कवी होते, त्यांनीच खऱ्या अर्थाने मराठीला श्रीमंती प्राप्त करुन दिली" अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार प्रा. एकनाथ चंदनखेडे यांनी मानले.या कार्यक्रमाला महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

**मराठी भाषागौरव दिन —**

मराठी वाङ्मय मंडळातर्फे कवी कुसुमाग्रज उपाख्य वि.वा.शिरवाडकर जयंतिप्रीत्यर्थ 'मराठी भाषागौरव दिन'थाटात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एन.वाय.लंजे तर

प्रमुख उपस्थितीत उपप्राचार्य डॉ.एस.एच.भैरम, प्रमुख वक्ता म्हणून स्व.निर्धनराव वाघाय पाटील महाविद्यालय चोपाचे मराठी विभागप्रमुख प्रा.जगदीश भैसारे ,मराठी विभागप्रमुख डॉ. चंद्रकुमार राहुले,डॉ.सी.एस.राणे,डॉ.इ.व्ही. चंदनखेडे,प्रा.लोकेश कटरे,इ.मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. या कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली

प्रमुख वक्ता प्रा.जगदीश भैसारे यांनी मराठी भाषेला ज्ञानभाषा व ई भाषा म्हणून विकसित करणे मराठी माणसांचे आद्यकर्तव्य आहे."अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणातून प्राचार्य डॉ .एन.वाय.लंजे यांनी "मराठी भाषा ह्यद्याची भाषा आहे, परंतु आज मराठी भाषेचा समाजाला विसर पडत आहे करीता मराठी भाषेचे संवर्धन व जतन करणे आपले सर्वांचे आद्यकर्तव्य आहे."अशाप्रकारचे मौलिक विचार व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.चंद्रकुमार राहुले, संचालन प्रा.लोकेश कटरे तर आभार डॉ. सी.एस.राणे यांनी मानले

Head
Deptt of Marathi
Jagat Arts Comm. & I H P. Science College
Goregaon Dist. Gondia

## अहवाल

## (INNOVATIVE PROGRAMME FOR P.G.STUDENTS IN MARATHI)

### पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांसाठी नाविन्यपूर्ण (अभ्यासपूरक) उपक्रम सत्र २०१७ ते २०२१

पदव्युत्तर मराठी विभागातील विद्यार्थ्यांना नियोजित अभ्यासक्रत शिकविला जातो परंतु त्यांच्या ज्ञानात भर पडावी व व्यक्तीमत्व विकास व्हावे या दृष्टीकोनातून पदव्युत्तर मराठी विभागातर्फे विविध नाविन्यपूर्ण, अभ्यासपूरक उपक्रम सत्र २०१७ ते २०२१या कालावधीत राबविले गेले व त्याचा प्रभाव किंवा फलश्रुती म्हणून विद्यार्थ्यांनमध्ये काही बदल घडून आले व राबविलेल्या नाविन्यपूर्ण उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या प्रतिभाशक्तीला बळ मिळाले व विद्यार्थ्यांमध्ये कृतीशील व उमक्रमशिल या गुणाची वाढ होण्यास मदत मिळाली. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे:—

'जागतिकीकरण आणि मराठी लोकनाट्ये या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्र:—

या चर्चासत्राचे आयोजन केल्यामुळे भारतीय संस्कृतीतील प्राचीन लोककला ज्या लोप होण्याच्या मार्गावर होत्या त्या त्याच्या बद्दलची जाणिव जागृती विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झाली व आज घडीला आपल्याशी निगडीत लोककला जतन करणे काळाची गरज आहे हे मूल्य विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे या चर्चासत्रामुळे शक्य झाले.तसेच विद्यार्थी या चर्चासत्रापासून प्रेरणा घेऊन प्रत्यक्ष तमाशा,दंडार यासारख्या वाङ्मय प्रकाराकडे आकर्षित होऊन प्रत्यक्ष कृती करण्यास सज्ज झाले व त्यांच्या लेखनातून लोकसाहित्याचे लेखनकार्य होऊ लागले.

'बळीराजाच्या मुला'प्रबोधनपर कार्यकम:—

प्रस्तुत कार्यक्रमाचा परीणाम प्रत्यक्ष—अप्रत्यक्ष विद्यार्थ्यांच्या व्यवहारात आपल्या निदर्शनात दिसू लागले.आपला भारत देश हा शेतीप्रधान देश आहे .शेतकऱ्याचे जीवन हे अतिशय कष्टप्रद जीवन आहे. त्यामुळे संकटांना घाबरुन आज आपल्या देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण दिवसेनदिवस वाढत चालले आहे परंतू शेतकऱ्यांना आत्महत्येपासून परावृत्त करणे ,शेतकऱ्यांच्या जीवनात आलेल्या संकटापासून शेतकऱ्यांना मनोधैर्य देणे हे सुध्दा आपल्या अभ्यासक्रमाचे उद्दीष्टे आहे त्यामुळे आमच्या महाविद्यालयात शेतकऱ्यांचे मुले बहूसंख्येने आहेत त्यामुळे त्यांचे प्रबोधन करुन अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांना मानसीक रित्या परीपक्व करणे हे सुध्दा या कार्यक्रम आयोजन मागे प्रधान हेतू होते व त्याचे परीणाम प्रत्यक्ष समाजात अनुभवास येत आहेत.

ग.दि.माडगूळकर व पु.ल.देशपांडे यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुलोत्सव कार्यक्रम:—

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये साहित्यीक अभिरुची निर्माण होऊन सृजनशिलता वाढीस लागली.तसेच या कार्यक्रमामुळे साहित्यींकांची आवड निर्माण होऊन विद्यार्थ्यी कवितालेखन,नाटयलेखन,वैचारीक लेखन,वक्तृत्व,निबंधलेखन याकडे आकर्षित होऊन साहित्यनिर्मीतीस चालना मिळाली.साहित्यीकांच्या साहित्यातून विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक बांधीलकी निर्माण झाली.

मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा:—

प्रस्तुत कार्यक्रमाच्या आयोजनातून मराठी भाषेबद्दलची विद्यार्थ्यांच्या मनात आपुलकी निर्माण होऊन मराठी भाषा व्यावहारिक दृष्टीकोनातून किती महत्वाची आहे हे लक्षात आले तसेच विद्यार्थ्यांना वृत्तपत्र,बातमीलेखन,पत्रलेखन,भाषांतर,इतिवृत्तलेखन हे कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केले.व विद्यार्थ्यांची या कार्यक्रमामुळे मराठी भाषा समृध्द होण्यास मदत झाली.

रसयात्रा एक रसास्वाद व्याख्यान:–

प्रस्तुत कार्यक्रमातून कवी कुसुमाग्रजांच्या सामाजिक,राजकीय,प्रेमविषयक दृष्टीकोन विद्यार्थ्यांमध्ये रूजविण्यास मदत झाली.त्यामुळे विद्यार्थी समाजाभीमुख होण्यास मदत झाली.विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती ,समाजमूल्ये,नैतिकता,मानवतावाद हे मूल्ये विद्यार्थ्यांनी आत्मसात केले.

मराठी भाषागौरव दिन –

मराठी भाषागौरव दिनामुळे विद्यार्थी मराठी भाषेबद्दल एकनिष्ठ झाले व व्यवहारात प्रत्यक्ष मराठी भाषेचे उपयोजन करु लागले.

अशाप्रकारे पदव्युत्तर मराठी विभागातर्फे विविध नाविन्यपूर्ण, अभ्यासपूरक उपक्रम सत्र २०१७ ते २०२१या कालावधीत राबविले गेले व त्याचा प्रभाव किंवा फलश्रृती म्हणून विद्यार्थ्यांनमध्ये काही बदल घडून आले

Head
Deptt. of Marathi
Jagat Arts Comm. & I H P. Science Colleg
Goregaon Dist. Gondia